नोटीस

जाक्र/जिपऊ/राग्रास्वअ/ 104 /२०२६
ग्रामपंचयात विभाग जि.प.धाराशिव
दिनांक04/05/२०२६

**श्री/श्रीमती----------------------------**
**सनदी लेखापाल**

**विषय:- सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणा करीता सनदी लेखापाल यांनी दरपत्रके सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** मा.राज्य प्रकल्प संचालक RGSA, पुणे यांचे पत्र जा.क्र.राग्रास्वअ/६४१/२०२५-२६ दिनांक. ०६/०४/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सदर योजनेअंतर्गत विविध बाबींवर झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करावयाचे आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२६-२६ या आर्थिक वर्षात अंदाजे रू. ७७.७१ लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

त्यानुसार आपण सदर लेखापरिक्षणाकरीता आकारण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण शुल्क (सर्व करांसहित) बाबत दरपत्रक या कार्यालयास दिनांक / /२०२६ पर्यंत सादर करावेत.

तसेच आपले लेखापरिक्षण शुल्काबाबत दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दिनांक / /२०२६ रोजी दु.४:०० वा.पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत. उशिराने प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त झालेले दरपत्रक दिनांक / /२०२६ रोजी सकाळी ११:०० वा. माझे दालनात उघडण्यात येतील. ज्या सनदी लेखापालाचे लेखापरिक्षण शुल्क इतरांच्या तुलनेत सर्वात कमी असतील त्यांना लेखापरिक्षणासाठी आदेश देण्यात येईल.

अटी व शर्ती

१.नियुक्ती आदेशात देण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.(सोबत अटी व शर्ती)

२.सदर नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.मु.का.अ. जि.प. धाराशिव यांना राहतील.

**अनंत कुंभार**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
जिल्हा परिषद धाराशिव



ile No ZPDHA-12/3/2026-ZPDHA-PAN (Computer No. 3215163)

## अटी व शर्ती

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत (RGSA) जिल्हा परिषद, धाराशिव सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत (RGSA) राबवीत असलेले सर्व प्रशिक्षण/शिबिरे/दौरे इत्यादीचे लेखापरीक्षण करावयाचे आहे.

२) आपणास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण शुल्क (सर्व करांसहित) या व्यतिरिक्त कोणत्याही कारणास्तव भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३) सनदी लेखापालांनी स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व परिशिष्ट-अ तीन प्रतीत लेखापरीक्षण झालेपासून १० दिवस मुदतीत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) मुदतीत लेखापरीक्षण अहवाल सादर न केल्यास आपल्या लेखा परिक्षण शुल्कातून १०% रक्कम कपात केली जाईल.

५) सनदी लेखापालांनी त्यांच्या अहवालात केंद्र शासनाच्या पत्रानुसार दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करुन खालील बाबी प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

a) योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून त्या अनुषंगाने लेखा तपासणी करण्यात आलेली आहे.

b) केंद्र शासनाने विहित केलेल्या अनुदानाच्या प्रमाणात राज्य शासनाने अनुदान वितरीत केलेले आहे.

c) लेखा तपासणी कालावधीत बँकेशी ताळमेळ घालण्यात आलेला आहे.

d) मालमत्ता नोंद वही अद्यावत ठेवण्यात आलेली आहे.

e) कुठलाही अग्रीम खर्च म्हणून दाखवण्यात आलेला नाही तसेच एका वर्षापेक्षा अधिक कालावधीत देण्यात आलेल्या अग्रीमचा अहवाल अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

f) या योजनेचा निधी अन्य योजनेमध्ये वळवण्यात आला नसल्याचे प्रमाणपत्र.

g) वरील सर्व प्रमाणपत्राशिवाय त्या त्या योजनेकरिता अपेक्षित असलेले प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांनी द्यावेत. उदा. एका योजनेचे एकच बँक खाते.

h) शासन करारनामा कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणू शकते.

६) आवश्यक कागदपत्राचा तपशील

a) नोदणी परवाना असणे आवश्यक

b) ICAI सदस्यत्व आवश्यक

c) CAG Empanelment NO

d) अनुभव ( किमान १० वर्ष

Digitally signed by
Anant Rambhau Kumbhar
Date: 04-05-2026
10:54:44

igitally signed by
nnasaheb Shridhar Patil
ate: 13-04-2026
5:06:06

Digitally signed by
Shailesh Kishan Vihire
Date: 13-04-2026
17:54:19

Digitally signed by
Pramod Kadaji Kamble
Date: 13-04-2026
18:18:19

**अनंत कुंभार**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
जिल्हा परिषद धाराशिव